# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## केस क्रं. ग्रागानिमं/नाशप/०६७/२००९

अर्जदार : श्री भोजराज माणिकराव आटोने
रा. पिपला, पोस्ट खानगाव,
तालुका काटोल
जिल्हा नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
काटोल विभाग,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती :

1) श्रीमती मीरा खडक्कार
सभापती,
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्री एस.एफ.लांजेवार
कार्यकारी अभियंता तथा
सदस्य-सचिव,
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

3) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा-हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

— आदेश —

पारीत दि. ०२.०२.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यानी सदर तक्रार अर्ज दिनांक 10.12.2009 रोजी महाराष्ट्र राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम 6.4 विनियम 2006 प्रमाणे दाखल केलेला आहे.

<u>अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील</u> :–

तक्रार कर्ता हा गैर अर्जदाराचा अधिकृत ग्राहक असुन त्याचा शेतात कृषि पंपाकरिता वि़द्युत पुरवठा होता. तक्रार कर्त्याचे असेही म्हणणे आहे की दिनांक 14.11.2007 पासुन त्या पंपाचा फ्युज गेल्यामुळे त्याचा पंप बंद होता, तक्रार कर्त्याने अनेक वेळा विज पुरवठा बंद असल्याबाबत तक्रार केली तरीही दुरूस्ती झाली नाही.

तक्रार कर्त्याने पुढे असेही म्हटले आहे की लाईन बंद असल्यामुळे शेतात पाणी देवू शकला नाही म्हणुन शेतातील 200 संत्र्याची झाडे वाळुन गेली व त्याचे 1 लाख रूपयाचे नुकसान झालेले असुन त्याने 1 लाख रूपये नुकसान भरपाई मागीतली आहे, तसेच मानसिक त्रासापोटी 10,000 रूपये मागीतले आहे.

गैरअर्जदाराने आपले मुद्यानिहाय उत्तर दिनांक 11.01.2010 रोजी मंचात दाखल केलेले आहेत.

गैरअर्जदाराचे असे ही म्हणणे आहे की, ग्राहकाची सदर तक्रार पुर्णपणे खोटी असुन महीला कनिष्ठ अभियंता यांना त्रास देण्याकरिता केलेली आहे. दि. 29.12.2007 रोजी ग्राहकास विज चोरी कायदा या अतंर्गत पकडण्यात आले व त्याचे कडुन रूपये 3500/– दंड वसुल करण्यात आलेला आहे.

तक्रार कर्त्याने वेळोवेळी रजिस्टर पोस्टाने तक्रार पाठविलेली आहे. त्याला त्याचे पत्राचे वेळोवेळी उत्तर देण्यात आले. तसेच कनिष्ठ अभियंता यांनी स्वतः शेतात जावुन तिन्ही फेज तपासले असता विद्युत प्रवाह

बिंदु पर्यंत कंपनीचा विद्युत पुरवठा चालु होता. तक्रार कर्त्यास सदर बाब दाखविण्यात आली.

तसेच विहीरीत मोटार नव्हती व एम.सी.सी.बी. पासुन मेन पर्यत वायरींग नव्हते, तसे तक्रार कर्त्यास कळविण्यात आले.

गैरअर्जदाराने असे ही म्हटले आहे की, अर्जदारास शेताला लागुन नहर असल्यामुळे शेतीचे नुकसान होण्याची शक्यता नाही तसे नुकसानही झालेले नाही. सदर तक्रार खोटी असल्यामुळे खारीज करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

मंचाने दोन्ही पक्षाचे म्हणणे एकुण घेतले, अर्जदाराचे असे म्हणणे आहे की त्याने दि. 14.11.2007 पासुन पंप बंद असल्यामुळे तक्रार वेळोवेळी केलेली आहे. गैरअर्जदाराने स्वतः तक्रार पुस्तीकेच्या काही भागाची छायांकीत प्रत दाखल केलेली आहे. त्यात त्याने केलेल्या तक्रारीची नोंद आहे असे त्याचे म्हणणे आहे.

गैरअर्जदाराने असे नमुद केले आहे की, सदर तक्रार पुस्तीकेच्या भागाचे सुक्ष्म अवलोकन केल्यास असे दिसुन येते की, तक्रार कर्त्याने तक्रार पुस्तीकेचे मोकळया जागेत तक्रार नोंदविलेली आहे, क्रमवारीत केलेली नाही.

गैरअर्जदाराचे म्हणणे तक्रार पुस्तीकेचे अवलोकन केल्यावर खरे वाटते, तक्रारकर्त्याने पान क्रं. 1 दि. 15.11.2007 रोजी श्री अशोक खराडे यांच्या तक्रारीनंतर दि. 25.11.2007 ला तक्रार केलेली आहे, पान क्रं. 2 गैरअर्जदाराच्या कार्यालयातील नोंदनी बुकात दि. 16,17, व 18 नोव्हेंबर 2007 व इतर नोंदी आहेत.

पान क्रं. 2 च्या मागील भागात 22, 23 व 24 नोव्हेंबर 2007 अशा तक्रारी आहेत, अर्जदाराने पान क्रं. 2 च्या मागील भागात तक्रार नोंदवायला हवी होती. तसेच त्याच्या इतर तक्रारी क्रमाप्रमाणे नोंदविल्या नाहीत, दोन तक्रारीच्या मध्ये नोंदविलेली तक्रार वेगळी दिसुन येते.

यावरून तक्रार कर्त्याने वांरवार तक्रार केल्याचे स्पष्ट होत नाही. त्यामुळे अर्जदाराचा विद्युत पुरवठा बंद असल्याचे दिसुन येत नाही.

गैरअर्जदाराने असे नमुद केले आहे की, दि. 02.01.2008 व 04.01.2008 रोजी मोक्याची तपासणी केली असता विद्युत पुरवठा सुरू असुन विहीरीत मोटर नव्हती व तसेच मेन वायरींग नव्हती तसे पत्र कनिष्ठ अभियंता यांनी दि. 05.01.2008 व 07.01.2008 रोजी पत्र दिलेले होते. परंतु तक्रार कर्त्याने पत्र घेण्यास नकार दिला.

यावरून असे स्पष्ट होते की तक्रार कर्ता सदर चौकशीच्या वेळी हजर होता, हे म्हणणे तक्रारकर्त्याने नाकारलेले नाही.

गैरअर्जदाराचे असे म्हणणे दि. 29.12.2007 रोजी तक्रार कर्त्याला विज चोरी करिता दंड झालेला असुन तक्रारकर्त्याने तो दंड भरलेला आहे.

गैरअर्जदाराने सदर दंडाच्या बिलाची छायांकीत प्रत दाखल केलेली आहे व गैरअर्जदाराने ती रक्कम भरल्याची नोंदही सदर बिलावर केली आहे यावरून गैरअर्जदारचे विज चोरी बद्द्लचे म्हणणे सिद्द होते.

तक्रार कर्त्याने त्याचे शेतातील संत्र्याची झाडे वाळल्याबदद्ल कुठलाही पुरावा दाखल केलेला नाही, त्याने त्याचा शेतात पंप व झाडे यांच्या फोटोचे सात फोटोप्रती दाखल केलेले आहे. तक्रार कर्त्याने दि. 09.01.2008 रोजी काढलेले फोटो दाखल केले आहेत, यावरून शेतातील कुठलेही झाडे वाळलेले नाही सर्वत्र हिरवेगार दिसत आहे, तक्रार कर्त्याने कृषी अधिका–याचे प्रमाणपत्र अथवा महसुल विभागाची झाडे वाळल्याची नोंद याबदद्ल कागदपत्र दाखल केलेले नाही.

याबदद्ल सदर संत्र्याची झाडे वाळल्याबदद्लचे म्हणणे खोटे असल्याचे लक्षात येईल.

सर्व घटनांचा विचार केल्यावर सदर तक्रार त्याने विज चोरी प्रकरणामुळे केलेली असावी असे दिसते.

दोन्ही पक्षाचे म्हणणे विचारात घेवून तसेच कागदपत्रांची पाहणी करून मंच या निष्कर्षास आलेला आहे की, तक्रार कर्ता हा त्याचे म्हणणे सिदध् करू शकला नाही म्हणुन तक्रार खारीज करण्यात येत आहे.

| सही/– | सही/– | सही/– |
|---|---|---|
| (एस.एफ. लांजेवार) | (श्रीमती गौरी चांद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या् | सभापती |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM
**MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION CO LTD's**
NAGPUR URBAN ZONE, NAGPUR.

सदस्य – सचिव
(कार्यकारी अभियंता)
ग्राहक गा–हाणे निवारण मंच (ना.श.प.)
म.रा विद्युत वितरण कंपनी मर्या. नागपूर